Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

# छत्रपती शाहू महाराजांचे आरक्षण विषयक धोरण

**शरद भिमराव गाडेकर**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर

## प्रस्तावना

छत्रपती शाहू महाराजांनी मार्गासवर्गीयांना 1902 मध्ये म्हणजेच जवळपास सव्वाशे वर्षांपूर्वी नोकऱ्यांमध्ये 50% आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता.अन् तो देशातला आरक्षणाबाबतचा पहिला निर्णय होता. अन् तो देशातला आरक्षणाबाबतचा पहिला निर्णय ठरला. छत्रपती शाहू महाराज यांनी 26 जुलै 1902 या दिवशी सरकार गॅझेटच्या माध्यमातून मागासवर्गीयांना नोकऱ्यांमध्ये 50% आरक्षण देण्याचा निर्णय घेतला.

आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीमध्ये कोल्हापूर संस्थानचे छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे महाराष्ट्रातील राजर्षी शाहू महाराजांचे समकालीन समाज सुधारक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या या महत्त्वपूर्ण योगदानाचा उल्लेख करता म्हटले होते, छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे कार्य, कर्तुत्व सामाजिक न्यायामध्ये गुंतलेले आहे. त्यांचे कार्य आणि कर्तुत्व सामाजिक न्यायाशी एकजीव झालेले दिसते. नैतिक, कायदेशीर आणि राजकीय तत्त्वज्ञान या तीन पातळ्यांवर त्याची सामाजिक न्यायाची संकल्पना व्यक्ती आणि समाज यांच्यातील निष्पक्ष आणि उचित संबंधाच्या जुळवा जुळवीचे दिसते.

छत्रपती राजर्षी शाहू महाराज आणि आरक्षण धोरण या विषयावरील शोधनिबंधाची मांडणी करताना प्रथमतः आरक्षण म्हणजे काय हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. कारण छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या संपूर्ण कारकिर्दीत सामाजिक न्यायाला महत्त्वपूर्ण स्थान दिले आहे आणि या सामाजिक न्यायातूनच आरक्षणाचे धोरण त्यांनी आपल्या राज्यामध्ये स्वीकारलेले पहायला मिळते म्हणून सामाजिक न्याय आणि आरक्षण हे दोन मुद्दे समजून घेणे गरजेचे आहे भारतातील आरक्षण म्हणजे मागासलेल्या आणि कमी प्रतिनिधित्व असलेल्या समाजातील लोकांसाठी सरकारी संस्थांमध्ये ठराविक टक्के जागा राखून ठेवणे. आरक्षणाचा मुख्य उद्देश समाजातील दुर्बल घटकांचे सक्षमीकरण करणे हा आहे. भारताच्या संविधानाचे उद्दिष्टच मुळात

समता प्रस्थापित करणे हे असल्यामुळे समाजात असलेली विषमता नष्ट करून समतेवर आधारित समाज निर्माण करण्यासाठी आरक्षणाची तरतूद त्यात करण्यात आलेली आहे. भारतीय समाजात आर्थिक, सामाजिक, राजकीय,शैक्षणिक, सांस्कृतिक, स्त्री-पुरुष विषमता मोठ्या प्रमाणात आहे. समाजातील विषमता नष्ट व्हावी आणि समता प्रस्थापित व्हावी हे ध्येय भारतीय संविधानाने स्वीकारलेले आहे. समाजात नागरिकांचे काही वर्ग पराकोटीचे मागासलेले असून, विकास व प्रतिष्ठा प्राप्त करून घेण्याची कोणतीही संधी त्यांच्या जवळ उपलब्ध नाही. हे लक्षात घेऊन भारतीय संविधानात मागासलेल्या नागरिकांसाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे. आरक्षण हा विषमता नाहीसा करण्याच्या अनेक मार्गांपैकी एक मार्ग आहे. जे मागासलेले आहेत त्यांना विशेष सोयी-सवलती, संधी देऊन त्यांचा विकास घडवून आणण्याची जबाबदारी शासनावर आहे. हे शासनाची कर्तव्य आहे; असा संविधानाचा उद्देश आहे. महात्मा फुलेंच्या निर्वाणानंतर मात्र फुल्यांचे काम शाहू महाराजांनी आपल्या हाती घेतले. कोल्हापूरच्या गादीवर आल्यानंतर त्यांनी आपल्या राजदंडाचा वापर शुद्राती शूद्रांच्या उद्धारासाठी केला.

छत्रपती शाहू महाराज यांचा आरक्षणाचा जाहीरनामा: छत्रपती शाहू महाराज यांनी आरक्षणासंदर्भात काढलेला जाहीरनाम्यावर डॉक्टर जयसिंगराव पवार यांनी अतिशय विस्तृतपणे लेखन आणि संशोधन केलं आहे. डॉक्टर जयसिंगराव पवार यांनी लिहिलेल्या 'राजर्षी शाहू छत्रपती जीवन आणि कार्य' या पुस्तकात आरक्षणासंदर्भात जाहीरनाम्याचा उल्लेख आढळतो. त्या जाहीरनाम्यात लिहिलं आहे की," सध्या कोल्हापूर संस्थानामध्ये सर्व वर्णाच्या प्रजेस शिक्षण देण्याबाबत व त्यांस उत्तेजन देण्याबद्दल प्रयत्न केले आहेत. परंतु सरकारच्या इच्छेप्रमाणे मागासलेल्या लोकांच्या स्थितीत सदरहू प्रयत्नास जितके गावे तितके यश आलेले नाही हे पाहून सरकारांस पार दिलगिरी वाटते. ह्या विषयाबद्दल काळजीपूर्वक विचारांती सरकारांनी असे ठरविले आहे.की, यशाच्या ह्या अभावाचे खरे कारण उंच प्रतीच्या शिक्षणास मोबदले पुरेसे विपुल दिले जात नाही हे होय,ह्या गोष्टीस काही अंशी तोंड काढण्याकरिता व उच्च प्रतीचे शिक्षणापर्यंत महाराज सरकारच्या प्रजानांपैकी मागासलेल्या वर्णांनी अभ्यास करावे, म्हणून उत्तेजन दाखल आपल्या संस्थानांच्या नोकरीचा आज पर्यंत चालू असलेल्या पेक्षा बराच मोठा भाग त्यांच्याकरिता निराळा राखून ठेवणे हे स्पष्ट होईल,असे सरकारांनी ठरविले आहे. ह्या रितीस अनुलक्षून महाराज सरकार असा हुकूम करितात की, हुकूम पोहोचल्या तारखेपासून रिकामे झालेल्या जागांपैकी शेकडा 50 जागा मागासलेल्या लोकांस भराव्या.ज्या ऑफिसांमध्ये मागासलेल्या वर्गांच्या

अंमलदारांचे प्रमाण सध्या शेकडा 50 पेक्षा कमी असेल, तर पुढची नेमणूक ह्या वर्गातील व्यक्तीची करावी.ह्या हुकूमाच्या प्रसिद्धी नंतर केलेल्या सर्व नेमणुकांचे तिमाही पत्रक प्रत्येक खात्याच्या मुख्यांनी सरकारांकडे पाठवावे. अशा प्रकारचा जाहीरनामा काढून शाहू महाराज यांनी देशातील पहिले आरक्षण लागू केले होते.

"राज्याची अधिकार सूत्रे हाती आली तेव्हा सर्वत्र एकाच सुशिक्षित जातीचे वर्चस्व होते.ऑफिसातून मागासलेल्या जातीचा एकही नोकर दिसत नव्हता. म्हणून त्यांचा दर्जा वाढवण्याकरिता मागासलेल्या सर्व जातींच्या लोकांना नोकरी देण्याचे धोरण ठेवावे लागेल".

राजर्षी शाहू महाराजांनी 16 एप्रिल 1920 रोजी नाशिक मध्ये आयोजित करण्यात आलेल्या निराश्रीत सोमवंशीय समाजाच्या सभेत केलेल्या भाषणातील हा अंश: छत्रपती शाहू महाराज यांचे शिक्षणासाठीचे विशेष प्रयत्न: शिक्षणाचे हेच महत्त्व ओळखून शाहू महाराजांनी या दृष्टीनं केलेल्या कार्याबाबत महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर कोल्हापूर जिल्हा या मध्येही सविस्तर उल्लेख करण्यात आला आहे. समाजातील वरच्या वर्गाला शिकवलं की ते त्यांच्यापेक्षा खालच्या वर्गातील लोकांना शिकवतील हा ब्रिटिशांचा सिद्धांत होता. पण त्यावर शाहूंचा विश्वास नव्हता.त्यामुळं प्रजेला किमान प्राथमिक शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले.

30 सप्टेंबर 1917 रोजी कोल्हापूर संस्थानातर्फे आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. शाहू महाराजांनी यासाठी खास विभागही सुरू केला आणि स्वतः त्यावर नजर ठेवली.जातीय विषमता नष्ट होण्यासाठी प्रत्येक जात आर्थिक दृष्ट्या सबल व्हायला हवी आणि ती आर्थिक दृष्ट्या सबल व्हायची असेल तर त्यांचा शैक्षणिक विकास होणं गरजेचं असेल तर त्यांचा शैक्षणिक विकास होणं गरजेचं आहे हे त्यांच्या लक्षात आल्यानं 1902 मध्ये आरक्षण लागू करण्यापूर्वी त्यांनी बहुजनांच्या शिक्षण प्रक्रियेला वेग मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते.त्यातूनच त्यांनी सुरू केलेली वस्तीगृहे आणि इतर अनेक शैक्षणिक धोरणांचा समावेश होता. त्याचा उल्लेखही या गॅझेटिअरमध्ये आहे.

छत्रपती शाहू महाराज आरक्षणामुळे बनले टीकेचे धनी: शाहू महाराजांनी उचललेलं हे पाऊल म्हणजे त्या वेळच्या प्रस्थापित ब्राह्मण वर्गाला त्यांच्या विरोधात असल्यासारखं वाटलं. त्यामुळं या जाहीरनाम्यावर या वर्गातून टीका झाल्याच डॉक्टर जयसिंगराव पवार यांनी त्यांच्या पुस्तकात म्हटलं आहे.त्यानुसार, प्रोफेसर विष्णू गोविंद विजापूरकर यांनी या जाहीरनाम्याची तुलना त्यांनी वृत्तपत्रांतील मृत्यू लेखाशी केली होती,असं जयसिंगराव पवार म्हणतात." कोल्हापूर

संस्थानातील ब्राह्मणांच्या वाजवी आकांक्षांना मुठमाती मिळाल्याने या अभूतपूर्व परिपत्रकाला मृत्यूलेखाचा सन्मान देणे योग्य ठरले", असं त्यांनी म्हटल्याचा उल्लेख यात आहे. शाहू महाराजांचा हा आरक्षणाचा निर्णय शेकडो वर्षापासून सुरू असलेलं धर्मकारण, समाजकारण,राजकारण यातील प्रस्थापित वर्गाच्या वर्चस्वाला धक्का होता. शिक्षण आणि नोकरी बाबतची गुलामी मानसिकता महाराजांनी मोडून काढली होती, त्यामुळं महाराजांवर अशा प्रमाणात टीका झाली.

आरक्षणाचा पहिला लाभः छत्रपती शाहू महाराजांच्या शिक्षणासंदर्भातील तरतुदी आणि आरक्षणाचा एकूणच धोरणाचा लाभ पुढं अनेकांना झाला. पण याचा लाभ घेणारे पहिले व्यक्ती देशाचे व्याख्यात नाम कृषी तज्ञ दिवंगत पांडुरंग चिमणाजी पाटील थोरात हे होते,असं इंग्रजीत सावंत यांनी बीबीसी बरोबर बोलताना सांगितलं. पाटील थोरात हे त्या कालच्या मागास मराठा समाजातील होते. शाहू महाराजांनी सुरू केलेल्या चळवळीचा लाभ त्यांना झाला असा उल्लेख शाहू महाराजांच्या पत्रामध्येही असल्याचं सावंत सांगतात.

शिक्षण घेऊन त्या जोरावर पाटील थोरात पदवीधर झाले आणि इंग्रज सरकारमध्ये त्यांना कृषी अधिकारी म्हणून नोकरी मिळाली. शाहू महाराजांच्या या शैक्षणिक आणि आरक्षणाच्या धोरणाचा एकूणच व्यापक परिणाम झाला.कारण शाहू महाराजांनी कारभार हाती घेण्यापूर्वी नोकऱ्यांमध्ये बहुसंख्य अगदी नगण्या होतं. पण त्यांचं निधन झालं तोपर्यंत ही परिस्थिती पूर्ण बदलली होती.

त्यावेळी सरकारी नोकरीमध्ये असलेले बहुसंख्य हे उच्च वर्णीय नव्हे तर बहुजन समाजातले होते आणि त्यामागं कारण होतं ते आरक्षणाचं,असं सावंत सांगतात.

छत्रपती शाहू महाराजांच्या हत्येचा कटः शाहू महाराजांनी मागासलेल्या वर्गाला पुढ आणण्यासाठी सुरू केलेले प्रयत्न तथाकथित उच्चवर्णीय किंवा सनातनी वर्गाला रुचलेले नव्हते, त्यातून त्यांच्या हत्येच्या कटापर्यंत मजल गेली होती, असा उल्लेख महाराष्ट्र शासनाचे महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर कोल्हापूर जिल्हा यात करण्यात आला आहे.

"समाजाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये आपण निर्माण केलेल्या वर्चस्वाला धक्का लागणार अशी भीती सनातनी वर्गाला होती. त्यामुळे सूडाच्या भावनेनं पेटलेल्या एका कट्टर गटानं शाहू महाराजांचं चारित्र्यहनन करण्यास सुरुवात केली होती," असं यात म्हटलं आहे.

एकीकडे चारित्र्य हनन सुरू असताना दुसरीकडं त्यांना ठार मारण्याचे प्रयत्नही सुरू होते, असा दावाही या गॅझेटिअर मध्ये करण्यात आला आहे.

शाहू महाराजांच्या हत्येचा कट रचला गेला होता, या दाव्यामध्ये तथ्य आहे, शाहू महाराजांनी 1902 मध्ये लागू केलेलं आरक्षण आणि त्याचा सामाजिक समर सतेच्या दृष्टीनं झालेला निर्विवाद आहे.त्याचवेळी आज सुरू असलेला आरक्षणाचा विषय हा पूर्णपणे वेगला.

"आजचा आरक्षणाचा विषय राजकीय वळण लागल्याने पूर्णपणे वेगळा आहे. शाहू महाराजांची आरक्षणामागे जी भावना किंवा सामाजिक दृष्टिकोन होता, तोच आज असेल असं म्हणता येणार नाही. शाहू महाराजांनी आरक्षण लागू केल्यानंतर आज जवळपास सव्वाशे वर्षांचा कालावधील लोटून गेला आहे. तरीही आजही आरक्षणाच्या विषयावर अशा प्रकारे वातावरण पहायला मिळतं." महात्मा फुलेंनीही आयुष्यभर अशाच प्रकारचं कार्य केलं.पण,शाहू महाराज राजे होते त्यामुळे त्याचा फायदा घेऊन त्यांनी या निर्णयाची अंमलबजावणी केली. ते पदावर नसते तर त्यांनाही हे शक्य झालं नसतं त्यामुळं त्यांनी त्यांच्या पदाचा समाजासाठी योग्य वापर केला.पुढं तोच धागा वापरून बाबासाहेब आंबेडकरांनीही हे धोरण पुढं नेलं.त्यामुळं राष्ट्रीय स्तरावर सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात दोन पावलं पुढे जाण्यात जे यश आलं त्याची बीजं शाहू महाराजांच्या या निर्णयामध्ये दिसतात.

**संदर्भ**

1.पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती पत्रव्यवहार आणि कायदे, मेहता पब्लिशिंग हाऊस कोल्हापूर.

2.डॉ.प्रकाश,पहिली आवृत्ती डिसेंबर 2020,भारतीय राज्यसंस्था आणि सामाजिक न्याय डायमंड पब्लीकेशन्श,पुणे.

3.राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे; डॉ.जयसिंग भाऊसाहेब पवार,मेहता पब्लिशिंग हाऊस.

4. थोरमोठे पाटील विपुल- महाराष्ट्रातील समाज सुधारक, लोकसेवा पब्लिकेशन पुणे.